# THE BOMBAY BHIL NAIK INAMS ABOLITION ACT, 1955
## ( Bombay XXI of 1955 )

## मुंबई भिल्ल नाईक इनामें रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५५

### अनुक्रमणिका

प्रस्तावना.

| कलमें. | | पान |
|---|---|---|
| १. | लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात ... ... ... ... ... ... | १३०९ |
| २. | व्याख्या ... ... ... ... ... ... ... | १३०९ |
| ३. | विवक्षित इनामांना अधिनियम लागू नसणें ... ... ... ... | १३१० |
| ४. | भिल्ल नाईक इनामें रद्द करण्याबाबत आणि इनाम गांवें व जमिनी परत घेण्याबाबत ... | १३१० |
| ५. | इनाम गांवें व इनाम जमिनी यांतील जमिनींच्या संबंधांतील भोगाधिकार हक्क ... | १३१० |
| ६. | लागवडीस न आणलेली व पडीत जमिनी व सदरहू संहितेच्या ३७ व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाची सर्व मालमत्ता सरकारकडे निहित होणें. | १३११ |
| ७. | जमिनींतील इतर हक्क रद्द केल्याबद्दल वगैरे नुकसानभरपाई देण्याची रीत ... | १३११ |
| ८. | न्यायालय शुल्क ... ... ... ... ... ... ... | १३१२ |
| ९. | कलेक्टरनें दिलेल्या निवाड्याचें व महसूल न्यायाधिकरणाच्या निकालाचे निर्णायकत्व | १३१२ |
| ९अ. | सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९३ वा याच्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाड्याच्या संबंधांत फेरतपासणीचे अधिकार. | १३१२ |
| १०. | चौकशी व कामकाजें ही न्यायसंबंधीं कामें असतील ... ... ... ... | १३१३ |
| ११. | हस्तांतरणीय रोख्यांच्या स्वरूपांत नुकसानभरपाईची रक्कम देणें ... ... | १३१३ |
| १२. | सन १९४८ चा मुंबईचा अधिनियम ६७, याचे उपबंध जमीन मालक व कुळें यांच्या मधील संबंधांस लागू असणें. | १३१३ |
| १३. | नियम ... ... ... ... ... ... ... | १३१३ |
| १४. | बचाव ... ... ... ... ... ... ... | १३१३ |

# सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१*

[मुंबई भिल्ल नाईक इनामें रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५५]

[३ जून १९५५]

या अधिनियमांत पुढील अधिनियमान्वयें सुधारणा करण्यांत आली आहे :—

सन १९५६ चा मुंबई अधिनियम, ४०

सन १९५८ चा मुंबई अधिनियम, ९३

## मुंबई राज्यांतील पश्चिम खानदेश व नाशिक जिल्ह्यांत प्रचलित असलेलीं भिल्ल नाईक इनामें रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई राज्यांतील पश्चिम खानदेश व नाशिक जिल्ह्यांत, राजकीयदृष्ट्या सरकारोपयोगी सेवेबद्दल धारण केलेलीं भिल्ल नाईक इनामें रद्द करणें आणि यांत यापुढें दिलेल्या इतर परिणामभूत व आनुषंगिक गोष्टींसाठीं तरतूद करणें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें आवश्यक व इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षीं याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबई भिल्ल नाईक इनामें रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५५, असें म्हणावें. लघु संज्ञा, व्याप्ति व सुरुवात

(२) तो मुंबई राज्यांतील पश्चिम खानदेश व नाशिक या जिल्ह्यांना लागू आहे.

(३) तो राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें याबाबत नेमील त्या तारखेस अंमलांत येईल.

२. (१) विषयांत किंवा संदर्भांत एतद्विरुद्ध कांहीं नसल्यास, ह्या अधिनियमांत— व्याख्या.

(१) "नेमलेली तारीख" या संज्ञेचा अर्थ, ज्या तारखेस हा अधिनियम अंमलांत येईल ती तारीख असा समजावा ;

(२) "भिल्ल नाईक इनाम" या संज्ञेचा अर्थ, महसूल विभागाचा सरकारी ठराव क्रमांक ५७६३, दिनांक १९ ऑगस्ट सन १९०२ यांत निर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती यांस अनुसरून राजकीयदृष्ट्या सरकारोपयोगी सेवेबद्दल अनुदान दिलेले आणि संहितेच्या ५३ व्या कलमाअन्वयें ठेवलेल्या दुमाला जमिनींच्या नोंदवहींत "वर्ग ६-सरकारोपयोगी ग्रामसेवक" म्हणून दाखल केलेलें गांव किंवा जमीन, असा समजावा आणि तींत, महसूल विभागांतील सरकारी आदेश क्रमांक २८८, दिनांक ११ जानेवारी सन १९११ याअन्वये नवापूर तालुक्याच्या मरोद या गांवांतील दिलेल्या जमिनींचा समावेश होतो;

(३) "संहिता" या संज्ञेचा अर्थ, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, असा समजावा ;

(४) "कलेक्टर" या संज्ञेत, राज्य सरकारनें या अधिनियमाअन्वयें कलेक्टरचीं कामें करण्यासाठीं व अधिकार चालविण्यासाठीं नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(५) "इनामदार" या संज्ञेचा अर्थ, भिल्ल नाईक इनाम धारण करणारा इसम, असा समजावा ;

(६) "इनाम गांव" किंवा "इनाम जमीन" या संज्ञेचा अर्थ, भिल्ल नाईक इनाम म्हणून इनामदारानें धारण केलेले, यथास्थिति गांव किंवा जमीन, असा समजावा ;

(७) "विहित" या संज्ञेचा अर्थ, ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें.

(२) या अधिनियमांत वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या इतर शब्दांचे व शब्दप्रयोगांचे संहितेत त्यांचे जे अर्थ दिले असतील, तेच अर्थ असतील.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

विवक्षित इनामांना अधिनियम लागू नसणें.

३. ह्या अधिनियमांतील कोणताहि मजकूर पुढील इनामांना लागू असणार नाहीं :—

(१) देवस्थान इनामें किंवा धार्मिक वा धर्मादाय संस्थांनीं धारण केलेलीं इनामें ; आणि

(२) सरकारोपयोगी सेवेबद्दल धारण केलेली भिल्ल नाईक इनामें याव्यतिरिक्त इनाम गांवांत किंवा इनाम जमिनींत धारण केलेली इतर इनामें.

स्पष्टीकरण—ह्या कलमाच्या कारणांकरितां धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठीं धारण केलेलें इनाम म्हणजे धार्मिक किंवा धर्मदाय संस्थेसाठीं त्यावेळच्या शासनाधिकाऱ्याने दिलेलें किंवा मान्यता दिलेले आणि संहीतेच्या ५३ व्या कलमान्वये ठेवलेल्या दुमाला जमिनींच्या नोंदणी पुस्तकांत किंवा सन १८७२ चा पेन्शनाबाबत अधिनियम या अन्वयें केलेल्या नियमांनुसार ठेवलेल्या कागदपत्रांत तसें इनाम म्हणून दाखल केलेलें इनाम होय.

भिल्ल नाईक इनामें रद्द करण्याबाबत आणि इनाम गांवे व जमिनी परत घेण्याबाबत.

४. कोणतीहि कबुलायत, अनुदान, सनद, किंवा आदेश किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला कोणताहि विधि यांत कांहीं असलें तरीहि नेमलेल्या तारखेपासून व त्या तारखेस,—

(१) सर्व भिल्ल नाईक इनामें रद्द करण्यांत आली आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे; व

(२) सेवा करण्याबद्दलची कोणतीहि जबाबदारी व अशा इनामांसंबंधींच्या सर्व इतर आनुषंगिक गोष्टी याअन्वयें नष्ट करण्यांत येत आहेत;

(३) सर्व इनाम गांवें व इनाम जमिनी याअन्वयें परत घेण्यांत येत आहेत आणि तीं संहितेच्या व त्याअन्वयें केलेल्या नियमांच्या उपबंधांनुसार जमीन महसूल देण्यास अधीन आहेत असें समजण्यांत आलें पाहिजे व बिनदुमाला जमिनींसंबंधींचें संहितेचे उपबंध व नियम अशा जमिनींना लागू असतील.

इनाम गांवे व इनाम जमिनी यांतील जमिनींच्या संबंधांतील भोगाधिकार हक्क.

५. (१) इनाम गांव व इनाम जमीन यांत,—

(१) नेमलेल्या तारखेस लागवड केलेल्या व इनामदारांच्या प्रत्यक्ष कबजांत असलेल्या किंवा पुढील कंडिका (ब) मध्यें निर्दिष्ट केलेल्या कनिष्ठ धारण करणाऱ्याव्यतिरिक्त त्याच्यामार्फत, किंवा त्याच्या कडून धारण करणाऱ्या इसमाच्या कबजांत असलेल्या जमिनींच्या संबंधांत, असा इनामदार हा, आणि

(२) नेमलेल्या तारखेस लागवड केलेल्या व इनामदारास फक्त वार्षिक आकार दिल्यावर कनिष्ठ धारण करणाऱ्याच्या कबजांत असलेल्या जमिनींच्या संबंधांत, असा कनिष्ठ धारक हा, अशा जमिनींच्या संबंधांत देण्याजोगा जमीन महसूल भरण्यास राज्य सरकारास प्रथमतः जबाबदार असेल व संहिते-अन्वयें किंवा त्याअन्वयें केलेल्या नियमाअन्वयें किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि इतर विधीअन्वयें भोगवटा करणारा म्हणून अशा जमिनींच्या संबंधांतील सर्व हक्क मिळण्याचा त्यास हक्क असेल व तो सर्वांस जबाबदार असेल :

परंतु, इनामदारामार्फत किंवा इनामदाराकडून धारण करणाऱ्या इसमाच्या कबजांत असलेल्या जमिनींच्या संबंधांत इनामदारास व कनिष्ठ धारकाच्या कबजांत असलेल्या जमिनींच्या संबंधांत कनिष्ठ धारकास त्यानें, राज्य सरकार, खास किंवा सामान्य आदेश करून ठरवील अशी परंतु अशा जमिनींच्या पूर्ण आकाराच्या रकमेच्या सहापटींइतक्या रकमेहून अधिक नाहीं इतकी भोगाधिकाराची किंमत राज्य सरकारास विहित केलेल्या मुदतींत दिल्यावर, भोगाधिकार करणाराचे हक्क मिळण्याचा हक्क असेल.

(२) जर इनामदार किंवा कनिष्ठ धारण करणारा हा विहित केलेल्या मुदतींत भोगाधिकाराची किंमत देण्यांत कसूर करील तर तो जमिनीचा अनधिकृतपणें भोगाधिकार करीत आहे, असें समजण्यांत येईल व संहितेच्या उपबंधानुसार संक्षिप्त चौकशी करून (जमिनींतून) काढून लावला जाण्यास तो जबाबदार असेल.

(३) कलेक्टरच्या आगाऊ मंजुरीवांचून व राज्य सरकार साधारण किंवा खास आदेश देऊन विहित करील अशी रक्कम भरल्यावाचून ह्या कलमाअन्वयें अनुदान दिलेल्या जमिनीचा भोगाधिकार ह्याचे हस्तांतर करतां कामा नये किंवा मोजूनमापून त्याची वांटणी करतां येणार नाहीं.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या व कलम ६ च्या प्रयोजनांकरितां एखादी जमीन ही, जर तिची ती नेमलेल्या तारखेच्या लगतपूर्वी लागोपाठ तीन वर्षे लागवड करण्यांत आली नसेल तर ती लागवड न केलेली जमीन म्हणून समजण्यांत आले पाहिजे.

लागवडीस न आणलेली व पडीत जमिनी व सदरहू संहितेच्या ३७ व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाची सर्व मालमत्ता सरकारकडे निहित होणें.

६. शंका दूर करण्यासाठीं याअन्वयें असें जाहीर करण्यांत येते कीं, मालमत्ता धारण करण्यास वैधरीत्या योग्य असलेल्या व्यक्तींच्या किंवा इसमांच्या समूहाच्या मालमत्ता नसलेल्या व त्यांत किंवा त्यावर अशा इसमांचे कोणतेहि हक्क जेथवर प्रस्थापित करतां येतील तेथवर तें खेरीजकरून, आणि त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि विधींत इतर रीतीनें तरतूद केलेली असेल तें खेरीजकरून इनाम गांवांतील किंवा इनाम जमिनींतील सर्व लागवडीस न आणलेल्या व पडीत जमिनी मग त्या आकारणी केलेल्या असोत अगर नसोत व संहितेचे कलम ३७ यांत उल्लेख केलेल्या इनाम गांवांतील किंवा इनाम जमिनींतील इतर प्रकारची मालमत्ता ही त्यांतील किंवा त्यांवरील किंवा त्यांच्या संबंधांतील सर्व हक्कांसह राज्य सरकारच्या मालमत्ता असतील व यथास्थिति, सदरहू संहितेचे कलम ३७ किंवा ३८ यांत तरतूद केलेल्या प्राधिकाऱ्यानें व प्रयोजनासाठीं त्यांची विल्हेवाट लावणें किंवा त्या बाजूस काढून ठेवणें हें वैध असेल.

जमिनींतील इतर हक्क रद्द केल्याबद्दल वगैरे नुकसानभरपाई देण्याची रीत.

७. (१) जर कोणत्याहि इसमास मालमत्तेंतील त्याच्या हक्कांपैकीं कोणतेहि हक्क किंवा हितसंबंध रद्द करणाऱ्या, नष्ट करणाऱ्या किंवा त्यांत बदल करणाऱ्या या अधिनियमाच्या उपबंधांमुळें नुकसानी पोहोंचली असेल तर नुकसान भरपाई मिळण्यासाठीं कलेक्टरकडे अर्ज करण्याचा अशा इसमास अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें अर्ज, नेमलेल्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत विहित केलेल्या नमुन्यांत कलेक्टरकडे केला पाहिजे. कलेक्टरनें सदरहू संहितेंत तरतूद केलेल्या रीतीनें रीतसर चौकशी केल्यानंतर, भूमि संपादन अधिनियम, १८९४ याचें कलम २३ पोट-कलम (१) व कलम २४ यांत तरतूद केलेल्या रीतीनें व पद्धतीबरहुकूम नुकसान भरपाईची रक्कम विहित करणारा निवाडा दिला पाहिजे.

(२-अ). (एक) जेव्हां पोट-कलम (२) अन्वयें निवाडा करणारा अधिकारी या अधिनियमाअन्वयेंचा कलेक्टर असेल परंतु जमीन महसूल अधिनियमाच्या ८ व्या कलमाअन्वयें नेमलेला कलेक्टर नसेल आणि अशा निवाड्याची रक्कम पांच हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हां, उक्त निवाडा—

(अ) निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक नसेल तर जमीन महसूल अधिनियमाच्या ८ व्या कलमाअन्वयें नेमलेल्या कलेक्टरच्या, किंवा

(ब) निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल परंतु एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर कमिशनरच्या, किंवा

(क) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर राज्य सरकारच्या,

आगाऊ अनुमतीवांचून करतां कामा नये.

(दोन) जेव्हां पोट-कलम (२) अन्वयें निवाडा करणारा अधिकारी या अधिनियमान्वयेंचा कलेक्टर असेल आणि त्याचप्रमाणें तो जमीन महसूल अधिनियमाच्या ८ व्या कलमाअन्वयें नेमलेला कलेक्टरहि असेल, आणि अशा निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हां असा निवाडा,—

(अ) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर, कमिशनरच्या, किंवा

(ब) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर, राज्य सरकारच्या,

आगाऊ अनुमतीवांचून करतां कामा नये.

(तीन) पोट-कलम (२) अन्वयेंचा प्रत्येक निवाडा भू-संपादन अधिनियम, १८९४ याच्या २६ व्या कलमांत विहित केलेल्या नमुन्यांत असला पाहिजे.

(३) या कलमांतील कांहींहि मजकूर कोणत्याहि इसमास, जमीन महसूल भरण्याची पूर्णतः किंवा अंशतः माफी असलेल्या कोणत्याहि जमिनीवर या अधिनियमाच्या उपबंधांअन्वयें संहितेच्या उपबंधानुसार संपूर्ण आकारणी आकारण्यांत आली आहे, या सबबीवर नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाहीं.

(४) कलेक्टरनें पोट-कलम (२) अन्वयें दिलेल्या निवाडयामुळें आपल्यावर अन्याय झाला आहे असें समजणारा कोणताहि इसम, सन १९३९ च्या मुंबईचा महसूल न्यायाधिकरण अधिनियमाअन्वयें रचना करण्यांत आलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे निवाडयाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अपील करण्याचा अधिकार आहे.

(५) पोट-कलम (४) अन्वयें केलेल्या अपिलांचा निकाल देतांना मुंबई महसूल न्यायाधिकरणानें व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वयें प्रारंभिक न्यायालयानें दिलेल्या हुकुमनाम्यावर किंवा आदेशावर करण्यांत आलेल्या अपिलांचा निकाल देतांना न्यायालयास जे अधिकार असतात व न्यायालयाकडून कामकाजाच्या ज्या कार्यरीतीचा अवलंब केला जातो तेच अधिकार चालविले पाहिजेत व त्याच कामकाजाच्या कार्यरीतीचा अवलंब केला पाहिजे.

(६) अपिले दाखल करण्याची मुदत मोजतांना सन १९०८ चा भारतीय मुदत अधिनियम याचीं कलमें ४, ५, १२ व १४ ही या कलमाअन्वयें केलेल्या अपिलांना लागू केली पाहिजेत.

न्यायालय शुल्क

८. न्यायालय शुल्क अधिनियम, १८७० यांत कांहीं असले तरीहि या अधिनियमान्वये मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या प्रत्येक अपिलावर विहित करण्यांत येईल इतक्या किमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावला पाहिजे.

कलेक्टरनें दिलेल्या निवाडयाचें व महसूल न्यायाधिकरणाच्या निकालाचे निर्णायकत्व.

९. कलेक्टरनें, मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे करावयाच्या अपिलास अधीन राहून दिलेला निवाडा व मुंबई महसूल न्यायाधिकरणानें अपिलावर दिलेला निकाल अखेरचा व निर्णायक असेल व त्यास कोणत्याहि न्यायालयांतील कोणत्याहि दाव्यांत किंवा कामकाजांत हरकत घेतां येणार नाहीं.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९३ वा याच्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाडयाच्या संबंधांत फेर-तपासणीचे अधिकार.

९-अ. जेव्हां मुंबई भू-सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५८ याच्या प्रारंभापूर्वी कलम ७, पोट-कलम (२) अन्वयें कोणताहि निवाडा करण्यांत आला असेल आणि कलम ७, पोट-कलम (४) अन्वयें अशा निवाडयाविरुद्ध, कोणतेंहि अपील दाखल करण्यांत आलें नसेल तेव्हां, कलम ९ यांत कोणताहि मजकूर असला तरीहि, राज्य सरकारास, अशा निवाडयासंबंधीच्या चौकशीची किंवा कामकाजाची वैधता, संयुक्तिकता किंवा नियमबद्धता याविषयीं स्वतःची खात्री करून घेण्याच्या कारणाकरितां अशा चौकशीचें किंवा कामकाजाचें दप्तर मागविण्याचा अधिकार आहे आणि जर, हितसंबंधित पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर, अशा चौकशीच्या किंवा कामकाजाच्या वैधतेविषयीं, संयुक्तिकतेविषयीं किंवा नियमबद्धतेविषयीं त्याची खात्री झाली नाहीं, तर त्यास निवाडा रद्द ठरविण्याचा आणि नव्यानें निवाडा करण्याविषयीं कलेक्टरास निदेश देण्याचा अधिकार आहे. आणि त्यानंतर निवाडा करण्यासंबंधींचें, अशा निवाडयाच्या निर्णायकत्वासंबंधींचें आणि निवाडयाविरुद्ध करावयाच्या अपिलासंबंधींचे, या अधिनियमाचे सर्व उपबंध योग्य त्या फेरफारांनिशीं अशा नवीन निवाडयास लागू होतील.

१०. कलेक्टर व मुंबई महसूल न्यायाधिकरण यांपुढील या अधिनियमान्वयेंची सर्व चौकशीची व कामकाजें हीं, भारतीय दण्ड संहिता याचीं कलमें १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायसंबंधीं कामें म्हणून समजण्यांत आली पाहिजे. चौकशी व कामकाजें ही न्यायसंबंधीं कामें असतील.

११. या अधिनियमाच्या उपबंधान्वयें देण्याजोगी नुकसानभरपाईची रक्कम हस्तांतरित करण्याजोग्य कर्जरोख्यांच्या स्वरूपांत देण्याजोगी असेल व त्यांवर ते काढल्याच्या तारखेपासून दरसाल दरशेंकडा तीन टक्के या दरानें व्याज मिळेल व त्या कर्जरोख्यांची रक्कम, ते काढल्याच्या तारखेपासून २० वर्षांच्या मुदतींत मुद्दल व व्याज यांच्या वार्षिक समान हप्त्यांनीं परतफेड करण्याजोगी असेल. सदरहू कर्जरोखे विहित करण्यांत येईल इतक्या किंमतीचे व अशा नमुन्यांत असतील. हस्तांतरणीय रोख्यांच्या स्वरुपांत नुकसान-भरपाईची रक्कम देणें.

१२. या अधिनियमांतील कोणत्याहि मजकुरांमुळें, मुंबई कूळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ याचे कोणतेहि उपबंध जेथवर सदरहू उपबंध या अधिनियमाच्या स्पष्ट उपबंधाशी कोणत्याहि प्रकारें विसंगत नसतील तेथवर त्या व्यतिरिक्त ते कोणत्याहि इनाम गांवास किंवा इनामी जमिनीस किंवा जमीनमालक व त्यांची कुळें यांच्या परस्पर हक्कांस व जबाबदारीस लागू असण्यास, कोणत्याहि प्रकारे बाध येतो, असें समजतां कामा नये. सन १९४८ चा मुंबईचा अधिनियम ६७ वा याचें उपबंध जमीनमालक व कुळें यांच्यामधील संबंधास लागू असणें.

१३. राज्य सरकारास, आगाऊ प्रसिद्ध करण्याचा शर्तीस अधीन राहुन, या अधिनियमाचे उपबंध पार पाडण्याच्या प्रयोजनांकरितां नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम कायम करण्यांत आल्या-नंतर राजपत्रांत प्रसिद्ध केले पाहिजेत. नियम.

१४. या अधिनियमांतील कोणत्याहि मजकुरानें,— बचाव.

(अ) नेमलेल्या तारखेपूर्वी अगोदरच पत्करलेल्या कोणत्याहि जबाबदारीस किंवा बंधनास; किंवा

(ब) अशा जबाबदारीच्या किंवा बंधनाच्या संबंधांतील कोणत्याहि कामकाजास किंवा उपाय-योजनेस बाध येतो असें समजतां कामा नयें व असें कोणतेंहि कामकाज किंवा उपाययोजना जणू हा अधि-नियम संमत झाला नव्हता अशा रीतीनें दाखल करण्याचा, चालू ठेवण्याचा किंवा अंमलांत आणण्याचा अधिकार आहे.